देशोन्नती



हिंगोलीः औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा लावल्यानंतर आरोपीला जेरबंद केले. यावेळी पत्रकार परिषदेत माहिती देताना पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्यासह पोलीस निरीक्षक विकास पाटील, गणपत राहिरे व तपास पथक

Hingoli Edition
Dec 30, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

देशोन्नती

# अनोळखी युवतीच्या खुनाला फुटली वाचा; आरोपी जेरबंद

औंढा ना. तालुक्यातील नागेशवाडी शिवारात आढळलेल्या अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा अवघ्या पाच दिवसात पोलिसांनी लावून गुन्ह्यातील आरोपीला आंध्रप्रदेशातून अटक केली.

- स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलिसांची कामगिरी
- डी मार्ट बिलावरून अनोळखी मृतदेहाची पटली ओळख
- खून करणाऱ्या आरोपीला आंध्र प्रदेशातील आदिलाबाद येथून केले अटक
- डी मार्ट बिलावरून अनोळखी मृतदेहाची पटली ओळख

देशोन्नती वृत्तसंकलन

हिंगोली/औंढा नागनाथः औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात एका अनोळखी तरूणीचा मृतदेह आढळून आला होता. सदर प्रकरणात तिचा गळा दाबून खून केल्याचे निष्पन्न झाल्याने खुनाचा गुन्हा दाखल झाला होता. अनोळखी युवतीची ओळख पटविण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे टाकले असताना सुतावरून स्वर्ग गाठीत पोलिसांनी या खुनाचा छडा लावून आरोपीला जेरबंद केले.

याबाबत जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिलेली माहिती अशी की, २४ डिसेंबर रोजी औंढा नागनाथ तालुक्यातील नागेशवाडी शिवारात मसोबा मंदिराच्या पाठीमागे जंगल परिसरात २५ ते ३० वर्षीय वयोगटातील अनोळखी महिलेचा मृतदेह आढळून आला. या मृतदेहाच्या अंगावर जखमा व तोंडून रक्त आल्याचे दिसून आल्याने हा खुनाचा प्रकार असावा, अशी शक्यता वर्तविली. त्या दृष्टीने हा गुन्हा उघड करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलिसांना सूचना दिल्या होत्या. यासाठी गुन्हे शाखेचे तीन व औंढा नागनाथ ठाण्याचे दोन असे एकूण पाच वेगवेगळे पथक करून तपास संमातर पद्धतीने करण्यात आला. या पथकाने घटनास्थळावरील पुरावे व सायबर तंत्रज्ञानाची मदत घेऊन बारकाईने अभ्यास केला. मृतदेहापासून काही अंतरावर एक बॅग मिळून आली. त्यामध्ये डीमार्टचे बील आढळून आले. त्यावरून पथकाने तपास सुरू केला असता अलका बाजीराव बेंद्रे (२९) रा. सदाफुले वस्ती जामखेड



## 'लिव्ह इन रिलेशनशिप' मधून घडली खुनाची घटना

जि. अहिल्यानगर (अहमदनगर) ही असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून पथकाने अधिक माहिती घेतली असता अलकाचे श्रीकांत सुरेश पिनलवार रा. मुघट ता. मुदखेड जि. नांदेड याच्यासोबत मागील नऊ महिन्यापासून 'लिव्ह इन रिलेशनशिप' मधून प्रेमसंबंध असल्याचे निदर्शनास आले. त्यावरून त्यांच्यात अधुनमधून वाद सुरू होता. श्रीकांतने छत्रपती संभाजीनगर येथील लाडगाव येथे किरायाच्या घरात २३ डिसेंबरला मध्यरात्री अलकाचा गळा दाबून खून केल्यानंतर तिचा मृतदेह नष्ट करण्याच्या उद्देशाने बॅगमध्ये मृतदेह टाकून जालना येथे जाण्याचे नियोजन केले होते. त्याला एक खासगी वाहन औंढा नागनाथ पर्यंत जात असल्याचे कळल्यावरून त्याने जालना येथे न थांबता औंढा नागनाथ येथे आला. बसस्थानकावर उतरल्या नंतर बॅगसह मृतदेह घेऊन मसोबा मंदिराच्या पाठीमागे हा मृतदेह फेकून तो आंधप्रदेशातील आदिलाबाद येथे आपल्या नातेवाईकाकडे निघून गेला. या खुनाचा उलगडा झाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला आदिलाबाद येथून ताब्यात घेतले. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय पोलीस अधिकारी आंबादास भुसारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विकास पाटील, औंढा ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणपत राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व औंढा ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष शेकडे, गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, पोलीस उपनिरीक्षक विक्रम विठूबोणे, माधव जिवारे, कपिल आगलावे यांच्यासह पांडूरंग राठोड, कोंडीबा मगरे, विक्रम कुंदनानी, गजानन पोकळे, किशोर कातकडे, निरंजन नलवार, दत्ता नागरे, आकाश टापरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, विठ्ठल काळे, नरेंद्र साळवे, हरीभाऊ गुंजकर, इम्रान सिद्दीकी, एकबाल शेख, मदार शेख यांनी केली आहे.

### दोन्ही पथकाला बक्षिस जाहीर

अनोळखी महिलेच्या खुनाचा छडा लावण्याचे पोलिसांसमोर आव्हान असताना स्थानिक गुन्हे शाखा व औंढा नागनाथ पोलीस ठाण्याच्या पथकाने या गुन्ह्याचा छडा लावून आरोपीला जेरबंद केल्याने जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दोन्ही पथकाला प्रत्येकी ३५ हजार रूपये असे एकूण ७० हजार रूपयाचे बक्षिस जाहीर केले.

Hingoli Edition
Dec 30, 2024 Page No. 1
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# डी मार्टच्या पावतीवरून खुनाची उकल

## लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये झालेल्या वादातून खून, पोलिसांनी आरोपीस ठोकल्या बेड्या




**हिंगोली, पुढारी वृत्तसेवा :** औंढा नागनाथ तालुक्यातील वगरवाडी शिवारात खून झालेल्या तरुणीच्या मृतदेहाच्या परिसरात सापडलेल्या डी मार्टच्या एका पावतीवरून पोलिसांनी खुनाच्या गुन्हयाची उकल केली आहे. लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये झालेल्या वादातून खून केलेल्या तरुणाला पोलिसांनी आदिलाबाद (तेलंगणा) येथून ताब्यात घेतल्याची माहिती पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

येथील पोलिस अधिक्षक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत गुन्हे शाखेचे निरीक्षक विकास पाटील, औंढा पोलिस ठाण्याचे निरीक्षक जी. एस. राहिरे उपस्थित होते. यावेळी कोकाटे यांनी सांगितले की, पाच दिवसांपासून औंढा नागनाथ पोलिस व गुन्हे शाखेचे पथक तरुणीची ओळख पटविण्याचे प्रयत्न करीत होते. त्यानंतर शनिवारी पुन्हा एकदा घटनास्थळाच्या परिसरात पाहणी केली असता एका डी मार्टची पावती सापडली.



त्यावरील काही माहितीच्या आधारे पोलिसांनी अहिल्यानगर जिल्हयातील जामखेड येथे जाऊन तरुणीची ओळख पटवली. सदर मुलगी अलका बाजीराव बेद्रे असल्याचे समजल्यानंतर गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील, जी. एस. राहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, संतोष शेकडे, उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, माधव जिव्हारे, कपील आगलावे, जमादार पांडूरंग राठोड, कोंडीबा मगरे, विक्रम कुंदनानी, गजानन पोकळे, किशोर कातकडे, निरंजन नलवार, दत्ता नागरे, आकाश टापरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, विठ्ठल काळे, नरेंद्र साळवे, हरिभऊ गुंजकर, इमरान सिद्दीकी, इक्बाल शेख, शेख मदार यांची पथके तयार केली. या पथकाने आधी छत्रपती संभाजीनगर येथे माहिती घेतल्यानंतर एक तरुण मागील नऊ महिन्यापासून तिच्यासोबत रिलेशनशिपमध्ये राहात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी त्या तरुणाची माहिती घेतली असता तो नांदेड जिल्हयातील मुगट येथील श्रीकांत पिनलवार (२४) असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्याच्या घरी छापा टाकला असता तो आदिलाबाद येथे नातेवाईकांकडे गेल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी आदिलाबाद येथे जाऊन त्यास ताब्यात घेतले. दरम्यान, अत्यंत क्लिष्ट अशा खुन प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखा व औंढा पोलीसांनी उलगडा केल्याने पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दोन्ही टिमला प्रत्येकी ३५ हजार रूपयांचे बक्षिस जाहीर केले. आरोपीस कठोर शिक्षा होईल या दृष्टीने दोषारोपपत्र दाखल केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**या प्रकरणातील अलका बेद्रे व श्रीकांत पिनलवार यांचे बीड जिल्हयात प्रवास करतांना बसमध्ये ओळख झाली. एकमेकांना मोबाईल नंबर दिल्यानंतर त्यांची दाट मैत्री झाली अन त्याचे रुपांतर प्रेमात झाले. मागील नऊ महिन्यापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहात असतांना २३ डिसेंबर रोजी दोघांत वाद झाला अन श्रीकांतने तिचा गळा दाबून खून केला. त्यानंतर एका बॅगमध्ये तिचा मृतदेह टाकून जालनाकडे निघाला. मात्र प्रवासी वाहन औंढा नागनाथपर्यंत असल्यामुळे तो औंढा नागनाथ येथे आला व त्याने मृतदेह वगरवाडी शिवारात फेकून नांदेडला गेल्याचे पोलिस चौकशीत स्पष्ट झाले.**

My Parbhani/Hingoli Edition
Dec 30, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

देने की खबर हैं।

# अज्ञात महिला की हत्या का मामला सुलझा, आरोपी हिरासत में

- प्रेमी ने की थी प्रेमिका की हत्या

जिला संवाददाता | हिंगोली

**हिंगोली जिले के औंढा नागनाथ तहसील में पांच दिन पहले मिली एक युवती के शव का प्रकरण सुलझाते हुए हिंगोली पुलिस ने मृतक महिला के प्रेमी को धर लिया।**



## इन्होंने की कार्रवाई

यह कार्रवाई पुलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, एसडीपीओ अंबादास भुसारे, पुलिस निरीक्षक विकास पाटील, पुलिस निरीक्षक गणेश राहिरे के मार्गदर्शन में सहायक पुलिस निरीक्षक संतोष शेकड़े, सहायक पुलिस निरीक्षक शिवसाम्ब घेवारे, पुलिस उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, माधव जिवारे, कपिल आगलावे, पुलिस कांस्टेबल पांडुरंग राठौड़, कोडिम्बा मगरे, विक्रम कुन्दनानी, गजानन पोकले, किशोर कटकड़े, निरंजन नलवार, दत्ता नागरे, आकाश टापरे, किशोर सावंत, विशाल खंडागले, विट्ठल काले, नरेंद्र साल्वे, हरिभाऊ गुंजकर, इमरान सिद्दीकी, इकबाल शेख, मदार शेख के दस्ते ने की।

## गला घोंटकर की थी हत्या

ज्ञात हो कि औंढा नागनाथ तहसील के नागेशवाडी परिसर में स्थित मसोबा मंदिर के पीछे वन क्षेत्र में 24 दिसंबर को 25 से 30 वर्ष उम्र की एक अज्ञात महिला का शव पाया गया था। चूंकि शव के नाक और मुंह से खून निकल रहा था और शरीर पर घाव दिखाई दे रहे थे। साफ दिख रहा था कि, महिला की हत्या की गई है। जानकारी मिलते ही पुलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, एसडीपीओ अंबादास भुसारे, एलसीबी के पुलिस निरीक्षक विकास पाटील, औंढा थाने के पुलिस निरिक्षक गणेश राहिरे ने तुरंत घटनास्थल का मुआयना किया। एलसीबी, औंढा पुलिस के दो अलग-अलग दस्ते बनाकर उक्त हत्या की समानांतर जांच शुरू की गई। साइबर तकनीक की मदद से घटनास्थल पर मौजूद साक्ष्यों का बारीकी से अध्ययन किया। आखिरकार शव की पहचान अलका बाजीराव बेद्रे उम्र 29 वर्ष के रूप में हुई। मृतक अलका यह अहिल्यानगर (अहमदनगर) जिले के जामखेड के सदापुले वस्ती ग्राम निवासी है। जांच दल ने विस्तारा से जानकारी हासील की तो पता चला की, मृतक महिला अलका एवं आरोपी श्रीकांत सुरेश पिनलवार, उम्र 24 वर्ष, निवासी नांदेड जिले के मुदखेड तहसील के मुघट ग्राम निवासी से पिछले 9 माह से अनैतिक प्रेम संबध चल रहा था। मृतक महिला और आरोपी के बीच लगातार विवाद हो रहा था, इसलिए आरोपी ने 23 दिसंबर की मध्य रात को छत्रपति संभाजीनगर जिले के लाडगांव में एक किराए के कमरे में अलका की गला घोंटकर हत्या कर दी और साक्ष्य मिटाने की नियत से 24 दिसंबर को उक्त शव को जंगल में फेंक दिया। स्थानीय अपराध शाखा के दस्ते ने आरोपी सुरेश पिनलवार को आदिलाबाद से गिरफ्तार कर लिया।

epaper-bhaskarhindi-com.wl6-demo.readwhere.com

दैनिक भास्कर
Mon, 30 December 2024
https://epaper.bhaskarhindi.com/c/76522131